# <u>नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०२० मधील अर्ज नि.क्र.१०६ वरील आदेश</u>

**CNRMHSN06000349-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांनी त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांच्या अर्जामधील कथन असे की, या कामातील प्रस्तुत प्रतिवादींना वादींनी दावेसोबत फेरिस्तने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती समन्स/नोटीसी सोबत आलेल्या नाहीत. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रतिवादींनी नि.क्र.१०३ व नि.क्र.१०४ कडे दिनांक २०/०९/२०२२ व दिनांक १५/१०/२०२२ रोजीचे पुरसिसने न्यायालयाच्या निदर्शनास आणले होते. प्रस्तुत प्रतिवादींनी नि.क्र.१०३ कडे दिलेल्या अर्जाप्रमाणे वादींनी मागील तारखेस दावेचे कागदपत्र नि.क्र.१०५ कडे दाखल केलेले आहेत. त्यामुळे त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी साधारण दोन महिन्यांचा तांत्रिक विलंब झालेला आहे. सदरचा विलंबा हा त्यांनी जाणुनबुजून केलेला नाही. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि.क्र.१०८ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादींना दावेची समन्स लागु झालेल्या नि.क्र.९७ कडे बेलीफाचा रिपोर्ट आहे. त्यावर सदर प्रतिवादी यांनी समन्स व नक्कल स्वीकारलेबाबतचा शेरा आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी त्यांनी कैफियत देण्यास जाणुनबुजून विलंब केलला आहे. सबब त्यांनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादींना दाव्यास कैफियत दाखल करण्यास ९० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांना तांत्रिक कारणामुळे कैफियत दाखल करता आली नसल्याचे कथन त्यांनी अर्जामध्ये केले आहे. अर्जात नमुद केलेली कथने ही संयुक्तिक वाटत नाहीत. तरी देखील

प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांची कैफियत अभिलेखावर आलेस वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांना संधी देणे आवश्यक वाटते. परंतु प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांनी सदरचा अर्ज उशिराने दाखल केल्याने दाव्याचे कामकाज लांबणीवर पडल्याने सदरचा अर्ज खर्च रक्कम रुपये २००/– वादीस देण्याच्या अटीवर मंजुर करणे योग्य वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये २००/– (र.रु. दोनशे मात्र) खर्च म्हणुन प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांनी वादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र.६अ, ६ब व १३अ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

**सही/–**

मिरज.

दि. २४/०१/२०२३

**(स्वाती भा. नाईकनवरे–गरड)**

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज